प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

जून 28, 2019

## आरबीआयकडून नवी दिल्ली येथे तिस-या लोकपाल कार्यालयाची स्थापना

डिसेंबर 5, 2018 रोजीच्या नाणेविषयक धोरण निवेदनात घोषित केल्यानुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेने, जानेवारी 31, 2019 रोजी डिजिटल व्यवहारांसाठीची लोकपाल योजना (ओएसडीटी) सुरु केली.

बँकिंग लोकपाल योजना व ओएसडीटी ह्या खालील तक्रार-निवारणाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी, रिझर्व्ह बँकेने, बँकिंग लोकपाल (बीओ) व डिजिटल व्यवहारांसाठी बँकिंग लोकपाल (ओडीटी) चे तिसरे कार्यालय नवी दिल्ली (नवी दिल्ली –3) येथे सुरु केले आहे. हे कार्यालय जुलै 1, 2019 पासून कार्यान्वित होईल.

नवी दिल्ली 1, 2 व 3 साठीचे क्षेत्रीय अधिकारक्षेत्र व नवी दिल्ली येथील बीओ व ओडीटीचे ई-मेल आयडी, जुलै 1, 2019 पासून खालीलप्रमाणे असतील :

| अनु. क्र | बीओ/ओडीटी | प्ादेशिक कार्यक्षेत्र | इमेल आयडी |
|---|---|---|---|
| 1 | नवी दिल्ली 1 | उत्तर, उत्तर- पश्चिम, पश्चिम, दक्षिण-पश्चिम, नवी दिल्ली आणि दिल्ली चे दक्षिण जिल्हे | mailto:bonewdelhi1@rbi.org.in (बीओ साठी)<br>mailto:odtnewdelhi1@rbi.org.in (ओडीटी साठी) |
| 2 | नवी दिल्ली 2 | हरियाणा (पंचकुला, यमुना नगर व अंबाला जिल्हा वगळता) आणि उत्तर प्रदेशातील गाझियाबाद व गौतम बुध्द नगर जिल्हे | mailto:bonewdelhi2@rbi.org.in (बीओ साठी)<br>mailto:odtnewdelhi2@rbi.org.in (ओडीटी साठी) |
| 3 | नवी दिल्ली 3 | उत्तर-पूर्व, मध्य, शाहदरा, दिल्लीचे पूर्व आणि दक्षिण-पूर्व जिल्हे | mailto:bonewdelhi3@rbi.org.in (बीओ साठी)<br>mailto:odtnewdelhi3@rbi.org.in (ओडीटी साठी) |

एप्रिल 26, 2019 च्या प्रेस प्रकाशनात घोषित केल्यानुसार, अबँकीय वित्तीय कंपन्यांसाठीच्या लोकपाल योजनेखालील क्षेत्रीय अधिकारक्षेत्रात कोणताही बदल नाही.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2018-2019/3085**